# जाहिर नोटीस
# रत्नागिरी येथील जिल्हा न्यायालयात

या जाहिर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की,

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथील अभिलेख कक्षामध्ये असलेल्या कॅनन कंपनी मॉडेल नं. २२०२ एन या मशिनकरिता नवीन ड्रम युनिट नग—१, खरेदी करावयाचे आहे.

तरी ज्या कोणाला वर नमूद केल्या प्रमाणे कॅनन कंपनी मॉडेल नं. २२०२ एन मशिनकरिता नविन ड्रम युनिट योग्य दरात उधारीने पुरविणे शक्य असेल त्यांनी दरपत्रके खालील अटी व शर्तीस अधीन राहून ही नोटीस जिल्हा न्यायालय, रत्नागिरीचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द केलेपासून सात दिवसांचे आत म्हणजेच दिनांक २०/०५/२०२० पर्यंत सहाय्यक अधिक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे समक्ष आणून दयावीत.

## दरपत्रकाबाबत अटी व शर्ती

१. दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशिलासह तारखेसहीत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे असावे. त्यामध्ये कर, वस्तुंची किंमत इत्यादी बाबी स्वतंत्र नमूद कराव्यात. तसेच दरपत्रकामध्ये किंवा लेटरहेडवर SGST/CGST क्रमांक नमूद करावा.

२. दरपत्रक बंद लखोटयातून असावे व लखोटा मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे नमूद असावा. सदर लखोटयावर कॅनन कंपनी मॉडेल नं. २२०२ एन करिता ड्रम युनिट खरेदीचे दरपत्रक असे नमूद असावे.

३. जाहीर नोटीसी मधील दिलेल्या तारखेनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

४. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रके विचारात घेणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

५. पुरविणेत आलेले ड्रम युनिट हे चांगल्या स्थितीत असणे आवश्यक आहे. सदर पुरविणेत आलेले ड्रम युनिट खराब निघाल्यास ते नव्याने पुरविणे बंधनकारक राहील.

६. दरपत्रक देणाऱ्या व्यक्तीने आपले दुकानाचे लायसन्स, पॅन कार्ड, बॅक पासबुकची झेरॉक्स प्रत व रद्द केलेला चेक दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

७. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रके नाकारण्याचा अधिकार प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांना राहील.

आज दिनांक १३/०५/२०२० रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

DISTRICT COURT OF RATNAGIRI

दिनांक — १३/०५/२०२०

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी